**प्रेस नोट** **दि.१३/०४/२०१९**

## खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## नदीत उडी मारलेल्या इसमास बाहेर काढुन भावाचे ताब्यात सुखरुप दिले

दि.०७/०४/२०१९ रोजी पो.शि. ३८२७ गिरासे व पो. शि. ८७८८ थोरात खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर हे बोपोडी बिट मार्शल कर्तव्यावर असताना त्यांना नियंत्रण कक्ष पुणे शहर येथुन १५/३० वा. चु सुमारास बोपोडी स्मशानभुमी याठिकाणी एक इसम पाण्यात उडी मारण्याचा प्रयत्न करीत असल्याचा कॉल प्राप्त झाला. सदर कॉल चे पुर्ततेकामी नमुद पोलीस कर्मचारी हे तात्काळ कॉल पॉईंटला रवाना झाले. कॉल पॉईंटला पोहचले असता तेथे एक इसम रा. बोपोडी, पुणे याने नदीत उडी मारली होती त्याला त्यांनी तेथील लोकांच्या मदतीने सदर इमसास पाण्यातुन वर काढले आणि त्याचे प्राण वाचवले. तदनंतर त्याचे नातेवाईकांचा शोध घेवुन त्याला त्याचे भावाचे ताब्यात सुखरुप देणेत आले आहे.

सदर उत्कृष्ठ कामगीरी पोलीस उप निरीक्षक श्री मुन्तोडे खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर व स.पो.फौ. बगाडे खडकी पोलीस स्टेशन, पुणे यांनी केली आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.